# पनवेल महानगरपालिका

## वैदयकीय आरोग्य विभाग

कार्यालय :- देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी,
पनवेल -४१०२०६.

दुरध्वनी कार्यालय : ०२२- २७४५८०४०/४१/४२
वैद्यकीय आरोग्य विभाग : ०२२ – २७४५५७५१
ई-मेल : mohpmc05@gmail.com

फॅक्स नं. : ०२२- २७४५२२३३
आयुक्त कार्यालय : ०२२- २७४५२३३९
वेबसाईट: www.panvelcorporation.com


जा.क्र./पमपा/वै.आ.वि/ २५८ /सन २०२३-२४

`दिनांक:-१८/११/२०२३

# पदभरती जाहिरात

**वाचा** :- १. १५ वा वित्त आयोग मार्गदर्शक सुचना सन २०२२-२३ नुसार मंजुर पदे

२. मा. सहसंचालक (तांत्रिक) राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे जा.क्र. राकाव्य/ १५ वा वित्त आयोग/ मनु. पदभरती / ३३३५-३६/२०२३ दि. १७.०४.२०२३ रोजीचे पत्र.

३. मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे जा. क्रं.राआसो/मनुष्यबळ कक्ष/सुधारित पदभरती समिती /१०२६६-१०६००/२०२३ दि.२६.०४.२०२३ रोजीचे पत्र

४. मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे जा. क्रं. राआसोमुं/मनुष्यबळ कक्ष/ पदभरती /१०६७०-११०१६/२०२३ दि.२७.०४.२०२३ रोजीचे पत्र.

५. सहाय्यक संचालक राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई यांचे जा.क्र. रानाआअ/शैक्षणिक पात्रता/ एनयुएचएम/२४००४-२४१८७/२३ दिं २४.०५.२०२३ रोजीचे पत्र.

६. मा. आयुक्त महोदयांची दि. २२.०८.२०२३ रोजीची मान्यता टिपणी.

पनवेल महानगरपालिका, १५ वा वित्त आयोग अंतर्गत रिक्त असलेल्या पदांवर खालील दर्शविल्याप्रमाणे निव्वळ कंत्राटी स्वरूपात करार पध्दतीने मानधन तत्वावर नियुक्ती करावयाची आहे. त्यासाठी पदभरती प्रक्रियेद्वारे इच्छुक व पात्र उमेदवारांच्या नेमणुका पनवेल महानगरपालिका यांच्या स्तरावरून गठीत केलेल्या समितीमार्फत थेट मुलाखतीद्वारे करण्यात येणार आहेत. यासाठी बुधवार दि.२९.११.२०२३ रोजी व त्यानंतर च्या प्रत्येक आठवडयातील प्रत्येक बुधवारी सकाळी ११.०० ते दु. ४.०० या वेळेमध्ये थेट मुलाखती आयोजित करण्यात येत आहेत (सदरहु पदे रिक्त असे पर्यंत ). सदर पदांसाठी अर्जाचा विहित नमुना पनवेल महानगरपालिकेच्या या www.panvelcorporation.com संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

Scanned with OKEN Scanner

**तरी इच्छुक व पात्र उमेदवारांनी वरील प्रमाणे मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.**

| अ क्र | पदाचे नाव | प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैदयकीय अधिकारी | SC - १<br>ST - १<br>NTB - १<br>OBC - २<br>OPEN- ३<br>**एकुण - ०८** | MBBS with Maharashtra Medical Council Registration (Preference will be given to experienced Candidates) | उच्चतम वयोमर्यादा ७० वर्ष | ६०,०००/- |

अर्जदाराच्या वरील मुलाखती नंतर प्रवर्गनिहाय निवड सुचीमधील पात्र उमेदवारांना गुणवत्तेनुसार वरील प्रसिध्द केलेल्या जागेवर त्या त्या प्रवर्गात नियुक्त्या दिल्या जातील व उर्वरीत पात्र उमेदवारांची प्रवर्गनिहाय प्रतिक्षायादी ठेवण्यात यईल. भविष्यात रिक्त होणाऱ्या पदावर या प्रतिक्षायादी मधील उमेदवारामधुन गुणवत्ता यादी प्रमाणे उमेदवारास नियुक्ती दिली जाईल.

**अर्जदाराची वयोमर्यादा-**

१. अर्ज भरण्याच्या दिनांकास उमेदवाराचे वय जाहिरातीमध्ये विहित केलेल्या वयोमर्यादेत असणे आवश्यक आहे.

२. मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे दि. २५ मे २०१९ रोजीच्या पत्रानुसार वैद्यकीय अधिकारी (MBBS), विशेषतज्ञ, अतिविशेषतज्ञ यांची वयोमर्यादा ७० वर्ष राहील. वयाच्या ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे कडुन प्राप्त केलेले शारिरीक दृष्टया व मानसिक दृष्ट्या सक्षम असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

**अर्ज भरण्या बाबतच्या सुचना-**

१. उमेदवाराने स्वत:चे पूर्ण नाव माध्यमिक शाळा प्रमाणपत्राप्रमाणे अचूकपणे नोंदवावे. अर्जासोबत माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्राची प्रत जोडावी.

२. माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली जन्मतारीख अर्जात नमूद करावी.

३. जाहिरात प्रसिध्द केलेल्या दिनांकापर्यंत असणारे उमेदवाराचे वय (दिवस, महिने व वर्ष )अचूक नमुद करावे.

४. अर्जात उमेदवाराचे लिंग व वैवाहिक दर्जा या बाबतची माहिती नमूद करावी.

Scanned with OKEN Scanner

५. महिला अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र (Marriage Certificate) तसेच नावत बदल असल्यास (Govt. Gazette) अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

६. अर्जामध्ये उमेदवाराने स्वत:च्या वैध ई-मेल आयडी/पर्यायी ई-मेल आयडी, चालू भ्रमणध्वनीचा क्रमांक/पर्यायी भ्रमणध्वनीचा क्रमांक नमूद करणे बंधनकारक आहे.

७. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी आहे किंवा कसे हे नमूद करणे आवश्यक आहे, असल्यास त्याबाबतचे विहीत प्रमाणपत्र (Domicile Certificate) अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

८. उमेदवाराने अर्जामध्ये आपला जात, धर्म हा तपशील अचूकपणे नमूद करावा.

९. इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, विशेष मागास प्रवर्ग, आर्थिक दृष्टया दुर्बल घटक प्रवर्गात मोडणाऱ्या उमेदवारांनी नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१०. अर्जदाराने आपला सध्याचा पत्ता व कायम स्वरूपी पत्ता अर्जामध्ये अचूक नमूद करावा.

११. अर्जदाराविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा, याबाबतचे हमी पत्र देण्यात यावे.

१२. अर्ज विहित नमुन्यात टंकलिखीत / स्वहस्ताक्षरात सर्व दृष्टीने पुर्ण असावेत. विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपुर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**शैक्षणिक अर्हता/पात्रता-**

१. शैक्षणिक अर्हतेबाबतचा सविस्तर व अचूक तपशील नोंद करावा.

२. उमेदवाराकडे जाहिराती मध्ये नमुद केलेली शैक्षणिक अर्हता असणे आवश्यक आहे.

३. अर्ज भरत असताना पात्रता परिक्षेत अंतिम वर्षात मिळालेले गुण व गुणांची टक्केवारी अचूकपणे नमूद करावी. ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमूद न करता गुण व गुणांची टक्केवारी नमूद करणे अनिवार्य आहे. प्रमाणपत्रात नमूद गुण व गुणांची टक्केवारी, अर्जातील नमुद टक्केवारीसी न जुळल्यास, असे अर्ज नामंजूर करण्यात येतील.

४. उमेदवारांनी मुलाखतीवेळी आवश्यक असलेल्या शैक्षणिक अर्हतेच्या मूळ गुणपत्रिका व इतर आवश्यक ती प्रमाणपत्रे सादर न केल्यास सदरील उमेदवारांना अपात्र ठरविले जाईल.

५. पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता/पात्रता ही शासकीय मान्यता प्राप्त विद्यापीठातूनच प्राप्त केलेली असणे आवश्यक आहे..

६. उमेदवारांनी अर्जामध्ये नमुद केलेल्या माहितीनुसार अर्जाची छाननी करण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

**अनुभव —**

१. शैक्षणिक अर्हता व आवश्यक अतिरिक्त शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचा शासकीय व निम शासकीय संस्थांमधील अनुभव ग्राह्य धरण्यात येईल. त्यामुळे अर्जदाराने शैक्षणिक अर्हता धारण करण्यापूर्वीच्या अनुभवाची नोंद करू नये. त्या अनुभवाची परिगणना करण्यात येणार नाही.

२. अनुभवाचा तपशील नमूद करीत असताना अर्जदाराने शासकीय व निम शासकीय संस्थेच्या अनुभव प्रमाणपत्रामधील दिनांक व कार्यमुक्तीचा दिनांक अचूकपणे नमूद करावा. सदर कालावधी अनुभव प्रमाणपत्रानुसारच नोंदविण्याची दक्षता घ्यावी. यामध्ये तफावत आढळल्यास सदर प्रमाणपत्र अवैध ठरविले जाईल.

३. ज्या पदाकरीता अर्ज केला आहे त्या पदाकरीता आवश्यक असलेला अनुभवच ग्राह्य धरण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर अनुभव असल्यास असा अनुभव विचारात घेतला जाणार नाही.

**संगणक अर्हता-**

१. MSCIT प्रमाणपत्र धारण करीत असल्याचा तपशील नमूद करावा..

**लहानं कुटुंबाचे प्रमाणपत्र-**

१. लहान कुटुंबाची अट दि. २३/०७/२०२० पासुन लागू करण्यात आली असून दि.२३/०७/२०२०. पासुन दोन पेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या पदभरतीसाठी अर्ज करण्यात पात्र ठरणार नाहीत.

२. विहित नमुन्यातील प्रमाणपत्र पात्र उमेदवाराने अर्जासोबत सादर करणे अनिवार्य आहे..

**अर्ज शुल्क -**

१. उमेदवारास अर्जासोबत अर्ज शुल्कासाठी कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (DD) जोडणे आवश्यक आहे. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू.१५०/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू.१००/- असे अर्जाचे शुल्क असेल. त्यासाठी राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष पुढील नावे काढावा. “ INTEGRATED HEALTH AND FAMILY WELFARE SOCIETY PANVEL”

२. उमेदवाराने स्वत:च्या नावे राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्ष (DD) काढावा या व्यतिरिक्त इतर कोणत्याही बँकेचा धनाकर्ष (Demand Draft) स्विकारला जाणार नाही. धनाकर्षा शिवाय प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. असे अर्ज अपात्र करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

Scanned with OKEN Scanner

**उमेदवारांचा फोटो व स्वाक्षरी-**

१. उमेदवाराने अर्जावरील फॉर्म वर फोटोकरीता राखीव ठेवलेल्या जागेवर त्यांचा अलीकडील काढलेला सुस्पष्ट फोटो चिकटवावा. फोटो स्टेपल करू नये.

२. अर्जदाराने स्वाक्षरी साठी राखीव ठेवलेल्या जागेत स्वाक्षरी करावी.

**निवड प्रक्रिया-**

या निवड प्रक्रियेसाठी मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे जा. क्रं. राआसोमुं/मनुष्यबळ कक्ष/ पदभरती /१०६७०-११०१६/२०२३ दि.२७.०४.२०२३ रोजीचे पत्राद्वारे प्राप्त सुचना पुढील प्रमाणे :-

१. सदर पदभरती करिता पात्र होणाऱ्या उमेदवारांची थेट मुलाखत पनवेल महानगरपालिका स्तरावरील निवड समितीमार्फत घेण्यात येईल.

२. मुलाखतीद्वारे निवड करावयाची असल्यास मा. अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई यांच्या दि.१७/०३/२०२२ रोजीच्या पत्रानुसार निकष लावून १:३ व १:५ उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडताना उमेदवाराचे गुणांकन खालील तक्त्यानुसार करण्यात येईल.

**गुणांकन पद्धती –**

| अ.क्र | विवरण | अधिकत्तम गुण |
|---|---|---|
| १ | Subject Knowledge | १० |
| २ | "Research & Academic Knowledge " | १० |
| ३ | Leadership Quality | १० |
| ४ | Administrative Abilities | १० |
| ५ | **Experience** | १० |
| | a) For Govt. Experience | २ Marks for one year |
| | b) For Private Experience | १ Marks for one year |
| | **एकुण गुण** | **५०** |

३. अर्जदाराच्या अर्जाची छाननी करून थेट मुलाखतीस पात्र झालेल्या उमेदवारांची यादी थेट मुलाखतीच्या वेळी सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल.

४. समान गुण प्राप्त झाल्यास ज्या उमेदवाराचे वय जास्त आहे अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल तसेच उमेदवारांचे गुणांकन (Merit) व वय देखील समान असेल तर अशा वेळी उमेदवाराचा संबंधित पदाशी निगडित अनुभव जास्त असेल अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

५. थेट मुलाखतीमध्ये निवड झालेल्या उमेदवारांची यादी व प्रतिक्षा यादी पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

६. सदर ई-मेल आयडी पदभरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत चालू राहील व त्यासाठी ई-मेल वेळोवेळी तपासण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

**सर्वसाधारण सुचना-**

१. सदर पदभरती प्रक्रिये बाबतच्या सर्व आवश्यक सुचना व माहिती पनवेल महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरच वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. या करीता उमेदवारांनी www.panvelcorporation.com या संकेस्थळास वेळोवेळी भेट देऊन माहिती प्राप्त करुन घेणे त्यांची जबाबदारी राहिल. पदभरतीच्या अनुषंगाने कोणत्याही उमेदवारास वैयक्तिक संपर्क साधण्यात येणार नाही.

२. जाहीरातीत नमूद केलेले पद हे पूर्णत: कंत्राटी स्वरुपाचे असून ते राज्यशासनाचे नियमित पद नाही, या पदाचा राज्य शासनाच्या पदाशी काहीही संबंध नसून उमेदवार भविष्यात राज्य शासनांच्या नियमित पदावर समायोजन करण्यांची मागणी करु शकणार नाही.

३. जाहीरातीत नमूद केलेल्या पदाचे वेतन हे **एकत्रित ठोक मानधन** आहे.

४. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश दिल्यानंतर ७ दिवसांच्या आत नियुक्तीचे ठिकाणी उपस्थित राहणे बंधनकारक राहील. (उमेदवाराने निवडीसाठी कोणत्याही दबाव तंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवार मुलाखतीस अपात्र ठरेल)

५. उमेदवाराने थेट मुलाखतीच्या वेळेस अर्जासोबत मुळ कागदपत्रे व त्याच्या साक्षांकित प्रती सादर करणे बंधनकारक आहे.

६. थेट मुलाखतीकरिता येणाऱ्या अराखीव प्रवर्गातील इच्छुक उमेदवारांनी फॉर्म सोबत खालील (१ ते १४) कागदपत्रे जोडावीत व राखीव प्रवर्ग (अजा, अज, भजक, इमाव, इडब्लुएस) उमेदवारांनी फॉर्म सोबत खालील (१ ते १६) कागदपत्रे जोडावीत.

इच्छुक उमेदवाराने संकेतस्थळावरील विहित नमुन्यातील भरलेला अर्ज व त्या संबंधातील आवश्यक त्या कागदपत्रासह **थेट मुलाखतीच्या दिवशी पनवेल महानगरपालिका (मुख्यालय)**, वैद्यकीय आरोग्य विभाग, पहिला मजला, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी पनवेल -४१०२०६, या पत्त्यावर पुढील वेळापत्रकानुसार थेट मुलाखतीकरिता उपस्थित राहावे.

Scanned with OKEN Scanner

**थेट मुलाखतीचे वेळापत्रक :-**

| अ. क्र. | पदाचे नाव | मुलाखत वार | वेळ | मुलाखतीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | **पुर्णवेळ वैद्यकीय अधिकारी** | बुधवार दि.२९.११.२०२३ रोजी व त्यानंतरच्या प्रत्येक आठवडयातील प्रत्येक बुधवारी | मुळ कागदपत्र तपासणी सकाळी ११ ते ०१ थेट मुलाखत ०२ ते ०४ | पनवेल महानगरपालिका वैदयकीय आरोग्य विभाग देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी पनवेल -४१०२०६, |

**मलाखतीवेळी खालील कागदपत्रासह उमेदवाराने हजर राहणे आवश्यक आहे.**

१) पुर्ण माहिती भरलेला फॉर्म

२) वयाचा पुरावा

३) पदवी/पदविका प्रमाणपत्र

४) गुणपत्रिका (सर्व वर्षाची गुणपत्रिका)

५) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (MBBS)/ Any other Medical Graduate with respective council registration(As Applicable).

६) शासकीय / निमशासकीय संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र कागदपत्रे

७) आधारकार्डची झेरॉक्स प्रत

८) सध्याचा फोटो (२ प्रती)

९) महिला अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र (Marriage Certificate) तसेच नावत बदल असल्यास राजपत्रातील(Govt. Gazette) आपल्या नावाचा उल्लेख असलेल्या पानाची झेरॉक्स प्रत.

१०) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र (प्रतिज्ञापत्र)

११) अर्जदारावर फौजदारी गुन्हा दाखल नसल्याचे हमीपत्र

१२) महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)

१३) राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (Demand Draft) - State Bank of India, Punjab National Bank, Bank of Baroda, Canara Bank, Union Bank of India,

Scanned with OKEN Scanner

Bank of India, Indian Bank, Central Bank of India, Indian Overseas Bank,

UCO Bank, Bank of Maharashtra, Punjab & Sindh Bank

१४) MS – CIT Certificate

१५) जात प्रमाणपत्र / जात वैधता प्रमाणपत्र सर्व राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी सादर करणे बंधनकारक आहे.

१६) नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र (अजा, अज प्रवर्ग वगळुन इतर राखीव प्रवर्गातील) उमेदवारांनी सादर करणे बंधनकारक आहे.

**सदर पदभरती प्रक्रियेत आवश्यकते नुसार बदल करण्याचे व सदर पदभरती अंशतः किंवा पूर्ण रद्द करण्याचे अधिकार अध्यक्ष, निवड समितीने राखून ठेवले आहेत. कृपया याची अर्जदारांने नोंद घ्यावी.**

(डॉ.आनंद गोसावी)
वैदयकीय आरोग्य अधिकारी
पनवेल महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

# अर्जाचा नमुना

( ______________________________ या पदासाठी अर्ज )

| उमेदवाराचा नजीकच्या काळातील (रुंदी ३.५ से.मी व उंची ४.५. से.मी) आकाराचा फोटो चिकटवून स्वत: साक्षांकीत करावा |
|---|

प्रति,
मा.आयुक्त
पनवेल महानगरपालिका

१. संपूर्ण नाव :---------------------------------------------------

(प्रथम आडनाव )

२. वडिलाचे / पतीचे नाव :---------------------------------------------------

३. सद्या राहण्याचा पत्ता :---------------------------------------------------

---------------------------------------------------

४. भ्रमणध्वनी क्रमांक :(१)-----------------------------(२)----------------------

५. जन्मतारीख :----------------------- दिनांक : / /२०२३ रोजीचे वय ----------

राष्ट्रीयत्व --------------------

६. उमेदवार विवाहीत / अविवाहित :-------------------------------------------

७. (अ ) जात :---------------------------------- (ब) जात वैधता प्रमाणपत्र : आहे/ नाही.

८. धर्म :------------------------------------------------------------------------

९. ई- मेल आयडी :------------------------------------------------------------------------

१०. खाली नमुद केलेल्या प्रवर्गापैकी योग्य चौकोनात ( ✔ ) अशी खुण करावी.

| अ.जा (SC) | अ. ज (ST) | वि.जा (अ) (VJ-A) | भ.ज (ब) (NT-B) | भ.ज (क) (NT-C) | भ.ज (ड) (NT-D) | वि.मा.प्र (SBC) | इ.मा.व (OBC) | ई.डब्ल्यु.एस (EWS) | खुला (OPEN) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

Scanned with OKEN Scanner

११. शैक्षणिक अर्हता :-

जसे MBBS

| उत्तीर्ण केलेली व्यवसायिक परिक्षा | विद्यापीठ/ मंडळाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | अंतिम वर्षाचे मिळालेले गुण (एकुण) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(स्वप्रमाणित केलेल्या प्रमाणपत्राच्या प्रती)

१२. अतिरिक्त अर्हता :-जसे पदवीत्तर

| उत्तीर्ण केलेली व्यवसायिक परिक्षा | विद्यापीठ/ मंडळाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | अंतिम वर्षाचे मिळालेले गुण (एकुण) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

(स्वप्रमाणित केलेल्या प्रमाणपत्राच्या प्रती)

१३. अनुभव

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकुण वर्षे | सेवा सोडल्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| | पासुन | पर्यंत | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(प्रमाणपत्राच्या प्रती)

१४.अवगत असणाऱ्या भाषा :

| | मराठी | हिंदी | इंग्रजी |
|---|---|---|---|
| बोलणे | | | |
| लेखन | | | |

१५. आपणा विरुद्ध न्याय प्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंग विषयक प्रकरण वा तत्सम इ. कारवाई चालु आहे काय ?(असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा)

१६. अर्जासोबत खालील छायांकित सत्य प्रती जोडलेल्या आहेत. (जात वैद्यता प्रमाणपत्र व स्त्री उमेदवारांनी विवाहानंतर नावात बदल झाला असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र/ नावात बदल झाल्याचे राजपत्र जोडणे बंधनकारक आहे.)

| | |
|---|---|
| १. | २ |
| ३. | ४. |

१७.वर नमुद केलेली सर्व माहिती खरी असनु ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुद्ध कायदेशिर कारवाई होईल यांची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक :

(अर्जदाराची स्वाक्षरी व नाव )

Scanned with OKEN Scanner

# फौजदारी गुन्हा दाखल नसले बाबतचे

# हमीपत्र

मी.श्री./श्रीमती/कुमारी.........................................................................................................

वय................ वर्ष...............................सध्या राहणार असे लिहुन देते/देतो की, या पत्यावर ................वर्षापसून आजपर्यंत राहत आहे.

तरी मी वास्तव्य करीत असलेल्या वरील नमूद कालावधीत माझेविरुद्ध मी राहत असलेल्या कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशनच्या आभिलेखावर काहीएक दखलपात्र गुन्हा अथवा आक्षेपार्ह नोंदी नाही.

सही/-

Scanned with OKEN Scanner

# प्रतिज्ञापन

## नमुना अ

मी श्री./श्रीमती/कुमारी ..........................................................................

श्री.........................................................................यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी

वय....... वर्ष, राहणार,.........................................................................

याद्वारे असे जाहिर करतो/करते की,

(१) मी ................................................ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ..............(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २३ जुलै, २०२० यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ............ आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा)

(३) दिनाक २३ जुलै, २०२० रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २३ जुलै, २०२० व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण:-

सही/-

दिनांक:-

d:\admin\deepak sangle\contractual staff\paripatrak.docx

Scanned with OKEN Scanner